# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:2/एनजीसी/न.प्र.त/2016/१६८
दिनांक : 4 FEB 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :-1) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली Advt.No.:Approval/01(02)/2016)
2) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक 2/एनजीसी/मान्यता/2016/ 156 , दि. 01/02/2016
3) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक 2/एनजीसी/मान्यता/2016/167 , दि. 04/02/2016

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या मान्यता प्रक्रीयेबाबतचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने दि. 21.02.2016 पर्यंत सादर करण्यासाठी संदर्भ क्रमांक 1 अन्वये जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. सदर जाहीरातीअन्वये परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक 2016-17 मधील मार्गदर्शक सूचनांनूसार ऑन लाईन पध्दतीने दि. 21.02.2016 पर्यंत ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्यास सूचित केले आहे. सदर जाहिरातीस अनुसरून संदर्भ क्रमांक 2 अन्वये राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यमान संस्थानी परिषदेस सादर केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. 08 फेब्रुवारी, 2016 पासनू लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार असून संबंधितांना दि. 22.02.2016 पर्यंत माहिती भरण्यास सूचित केले आहे. **नविन तंत्र शिक्षण संस्था सुरू करणे, संस्थेचे नवीन जागेत स्थलांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थानी परिषदेस अर्ज केले असतील त्यांना आपल्याकडे संपर्कासाठी सूचित केले आहे**. प्रस्तूत आपल्या कार्यालयास प्राप्त होणारे प्रस्तावांबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-2013/प्र.क्र.43/तांशि 4, दि. 21.08.2013 अन्वये (सोबत प्रत जोडली आहे) नोंदणी शुल्क निर्धारीत करण्यात आले आहे. त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क जमा करण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तूकला परिषदेकडे पाठविण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

2. शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून **नविन तंत्र शिक्षण संस्था सुरू करणे, संस्थेचे नवीन जागेत स्थलांतरण, संस्था बंद करणे इ.** बाबत ज्या संस्थांनी परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थानी दिनांक 22/ 02/2016 पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह आपल्या कार्यालयास संपर्कासाठी सूचित केले आहे. याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने दि.21.08.2013 मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थेने नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क भरल्यानंतरच आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये **स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र व आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश**

**करण्यात यावा** व सदर समितीने शिखर परिषदांच्या मानकाप्रमाणे जमीनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदरहरणार्थ 7/12 चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँड युज सर्टिफिकेट, ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट, बांधकाम प्रमाणपत्र, कौन्सील ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टर आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले नकाशे, बांधकामाचे मोजमाप इत्यादी सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करण्यात यावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष 2016-17 करीताच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक / वास्तुकला परिषदेने निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करण्यात यावी. तपासणी समितीचा अहवाल संबंधित संस्थेच्या प्रस्तावाच्या प्रतीसोबत सोबतच्या **Annexure "A" व "B"** मध्ये (सोबत प्रत जोडली आहे) अभ्यासक्रमनिहाय तीन प्रतीत भरुन दि. 24.02.2016 पर्यंत आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह (Remommended / Not - Recommended ) उपलब्ध करुन द्यावा. तसेच सदर अहवालाची सॉफ्ट कॉपी (इंग्रजी टाईम्स न्यु रोमन फॉन्टमध्ये) ई-मेल व्दारे [dtedesk2@gmail.com ] सुध्दा उपलब्ध करुन द्यावी.

3. शैक्षणिक वर्ष 2013-14 पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत् आराखडा [Perspective Plan] तयार केला असून तो संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध असून परिषदेस प्रस्ताव सादर करतांना बृहत् आराखडयामध्ये शैक्षणिक वर्ष 2016-17 करीता उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात यावी, याबाबतची माहिती नवीन संस्थाना आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

4. विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सुरू असलेल्या अभ्यासक्रमात वाढ - घट, संस्था स्थलांतरण, अभ्यासक्रम बंद करणे, पीआयओ / एनआरआयच्या जागा, इंटीग्रेटेड अभ्यासक्रम, नावात बदल, महिलांसाठीच्या संस्थाचे सर्वसाधरण संस्थेत रुपांतरण इ. बाबत दि. 21.08.2013 च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी / तपासणी शुल्क ज्या संस्था भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावावर शासनाचे अभिप्राय अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तूकला परिषदेकडे पाठविण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

५. **अ.क्र. 4 मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांपैकी विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, पीआयओ / एनआरआयच्या जागा, इंटीग्रेटेड अभ्यासक्रम इ. करीता** परिषदेस सादर केलेल्या अर्जाबाबत शासनाचे अभिप्राय पाठविण्याच्या हेतूने या संचालनालयात सुनावण्या घेण्यात येणार असून त्याबाबतचे वेळापत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर सुनावणीस येतांना खालील कागदपत्रांचे २ संच (स्पायलर बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अर्जात सादर केलेल्या माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१६-१७ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील याबाबतची माहिती आपल्या कार्यक्षेत्रातील परिषदेस अर्ज केलेल्या संस्थाना आपल्या स्तरावरून देण्यात यावी.

- संस्थेचा ठराव
- नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी ॲक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत
- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.
- प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O Office).
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत.
- ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर ॲनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
- जमिन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

6. अ.क्र. 4 मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावांपैकी **विद्यमान संस्थेतील सध्या सुरू असलेला अभ्यासक्रम बंद करणे (द्वितीय पाळीतील अभ्यासक्रम वगळून), महिलांसाठीच्या संस्थाचे सर्वसाधारण संस्थेत रुपांतरण व विद्यमान संस्थेच्या नांवात बदल** इ. बाबत या संचालनालयात **सुनावणी न घेता** प्रकरणपरत्वे शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार असून अर्जनिहाय खालील दस्तावेज / कागदपत्रे संस्थेच्या पत्रासोबत द्विप्रतीत सादर करण्यास सबंधित संस्थाना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे

6.1. **विद्यमान संस्थेतील सध्या सुरू असलेला अभ्यासक्रम बंद करणे (द्वितीय पाळीतील अभ्यासक्रम वगळून), सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट व संस्थेच्या नावांत बदल** इ. बाबतच्या प्रस्तावासोबत दि. 21.08.2013 च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत, संस्थेच्या व्यवस्थापनाचा निर्णय, संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, या आशयाचे रु.100/- चे नोंदणीकृत लेखी प्रतिज्ञापत्र, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे शैक्षणिक वर्ष 2015-16 चे मान्यता पत्र / मुदतवाढ पत्र.

6.2. **महिलांसाठीच्या संस्थाचे सर्वसाधारण संस्थेत रुपांतरण करण्यासाठीच्या प्रस्तावासोबत** प्रस्तावासोबत दि. 21.08.2013 च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत, संस्थेचा निर्णय, गत लागोपाठच्या ३ वर्षात ६० % व त्यापेक्षा कमी प्रवेश असल्याचे प्रमाणपत्र, गत लागोपाठच्या ३ वर्षात प्रत्यक्षांत नोंदेणी झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलसचिव, संबधित विद्यापीठ यांचे प्रमाणपत्र, संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे शैक्षणिक वर्ष 2015-16 चे मान्यता पत्र / मुदतवाढ पत्र.

7. **अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, वास्तुकला परिषद, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थाना आपल्याकडे जमा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त प्रस्तावांना पोच देऊन सदर प्रस्ताव आपल्या स्तरावर जतन करण्यात यावेत.**

8. अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाची सन 2015 मध्ये झालेल्या तपासणीस आढळलेल्या त्रृटींची पुर्तता 3 महिन्यांत करण्यासाठी दि. 09.10.2015 च्या पत्रान्वये सूचित केले आहे. त्यानुसार या संचालनालयाने दि. 19.12.2015 च्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानके व प्रमाणकांनुसार त्रृटी पुर्ततेबाबत ची शहानिशा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती संस्थानिहाय या कार्यालयास दि. 22.02.2016 पुर्वी निश्चितपणे सादर करावी.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुकला परिषदने निर्धारीत केलेल्या संबंधित प्रस्तावांबाबते शासनाचे अभिप्राय शिखर परिषदांकडे पाठविण्याबाबतचा कालावधी अल्प असल्यामुळे प्राप्त होणा-या सर्व प्रस्तावांची शिफारस शासनाकडे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असल्याने याबाबत प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी. सदर काम विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधित संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावर सबंधितांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत. **नवीन संस्था सुरू करणे, संस्था बंद करणे व संस्था नविन जागेत स्थलांतरण करणे याबाबतच्या प्रस्तावांचे तपासणी अहवाल** दि. 24.02.2016 पर्यंत **किंवा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेमार्फत वेळावेळी अद्ययावत करण्यात येणा-या अंतिम दिनांकापर्यंत या कार्यालयास सादर करावेत अन्यथा याबाबतची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.**

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/2016/ 317
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांकः- 6 FEB 2016

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, नविन तंत्रशिक्षण संस्था सुरू करणे, संस्थेचे स्थलांतरण, संस्था बंद करणे व विद्यमान संस्थेमध्ये नविन अभ्यासक्रम सुरू करणे, बंद करणे, प्रवेश क्षमतेत वाढ/घट करणे इत्यादीबाबत वरीलप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

**Annexure-A**

**Joint Director Regional Office:-** ____________________

## Report for Establishment of New Institutions from A.Y. 2016-17

| | |
|---|---|
| Name & Address of the Society/ Trust | |
| (a) Registration Number and Date | |
| (b) Name & Details of contact person (Chairman/Secretary) | |
| (c) Name & Address of the Institute | |
| (d) Proposed courses with Intake of each Course | 1)<br>2)<br>3)<br>4)<br>5) |
| (e) Details of processing fee paid to the Joint Directors office. | Amount :-<br>DD No. :-<br>Bank Name :-<br>Receipt No. :- |

| S.No. | Parameters | Available |
|---|---|---|
| 1. | Proposed Institute located at | Mega and Metro / Urban / Rural / |
| 2. | Availability of land in Acres with Survey No. (---------------------------) | |
| 3. | Whether Land is in the name of Trust? | Yes / No |
| 4. | i) Whether Land is N.A.?<br>If yes, give the name of sanctioning Authority. | Yes / No |
| | ii) Land use/conversion certificate? | Yes / No |
| | iii) Whether Other Institutions are running in the same land? If yes, how much is the land earmarked for each course. | |
| 5. | Whether Building plan is prepared by Registered Architect? (Register with CoA) | Yes / No<br>If yes Registration No. --- ----------------------- |
| 6. | i) Whether Building plan is approved by competent authority ?<br>If yes, give name of sanctioning authority ------------------------------- - Letter No. ------------------------------ Date------------------------------ | Yes / No |
| | ii) Total carpet area of the building as per Plan | ____________ **Sq.mts.** |

| | | |
|---|---|---|
| | iii) Actual available carpet area | ________ Sq.mts |
| | iv) Total Built up area as per Plan | ________ Sq.mts. |
| | v) Actual available Built up area | ________ Sq.mts. |
| | vi) Whether other Courses are running in same building? | Yes / No |
| 7. | Is the Computer Center and required number of computers are available? | Yes / No |
| 8. | Is the furniture required for class room, laboratories, officer etc. is available? | Yes / No |
| 9. | **Essential Parameters as per AICTE 's ( Refer AICTE Approval Process Handbook - 2016-17, Page No. 97-98)** | Yes / No |
| | 1. Stand alone Language Laboratory | Yes / No |
| | 2. Potable Water supply and outlets for drinking water at strategic locations | Yes / No |
| | 3. Electric Supply | Yes / No |
| | 4. Sewage Disposal | Yes / No |
| | 5. Telephone and FAX | Yes / No |
| | 6. Vehicle Parking | Yes / No |
| | 7. Institution web site with mandatory disclosure. | Yes / No |
| | 8. Barrier Free Built Environment for disabled and elderly persons including availability of specially designed toilets for ladies and gents separately. As per norms. | Yes / No |
| | 9. Safety provisions including fire and other calamities | Yes / No |
| | 10. General Insurance provided for assets against fire, burglary and other calamities | Yes / No |
| | 11. Road suitable for use by Motor vehicle- Motorised Road | Yes / No |

| | | |
|---|---|---|
| | 12. General Notice Board and Departmental Notice Boards | Yes / No |
| | 13. First Aid, Medical and Counseling facility. | Yes / No |
| | 14. Appointment of Student Counselor | Yes / No |
| | 15. Establishment of Anti Ragging Committee | Yes / No |
| | 16. Establishment of grievance redressal committee in the Institute and Appointment of OMBUDSMAN by the University | Yes / No |
| | 17. Establishment of Internal Complaint Committee (ICE) | Yes / No |
| | 18. Establishment of Committee for SC/ST | Yes / No |

| 10. | Funds | | Bank Name & Address | Amount Rs. | FDR No. | Maturity Date |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | F.D.R. | | | | |
| | | | **Total** | | | |
| | | | Bank Name & Address | Account No. | Amount | Balance as on |
| | | Saving / Current A/c | | | | |

**Remarks/Observation of the Committee:-**

**Signature of the Committee Members:-**

( )

**Jt. Director**
**Technical Education,**
**Regional Office.**

# Annexure B

**Regional Office**

**Statement showing information for starting of New Institutes for A/Y.2016-17.**

| Sr.No./ Code No. | Name of the trust with address & Ph.numbers | Name & address of the proposed instt. | Name & Ph. Numbers of President/ Secretary | Proposed Courses & Intake for A.Y. 2016-17 | | Remarks/ Observation of the Committee appointed by Jt. Director | Comments of the Jt. Director |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Course Name | Intake | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

( )

**Jt. Director**
**Technical Education,**
**Regional Office.**